नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 12/02/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## विनयभंग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दि. 09/02/2021 वा. चे 23:00 वा. चे सुमारास 28 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि तिचे घरी एकटी जात असतांना आरोपी नामे– 1) मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम, वय 32 वर्ष, रा. बोरी व 2) दिपक रामजलम राणे, वय 30 वर्ष, रा. छोटी बोरी यांनी आपसात संगनमत करून चारचाकी वाहनामधुन उतरून त्यांनी पोलीस असल्याची बतावणी केली. त्यानंतर आरोपीचे चार चाकी वाहन गेल्यावर त्यातील एका आरोपीने पल्सर मोटरसायकल आणली आणि दोन्ही आरोपींनी पोलीस असल्याची बतावणी करून फिर्यादीस म्हटले की, ''एवढया रात्री तु एकटी कुठे जात आहे,'' असे विचारपूस करून फिर्यादीचा मोबाईल नंबर मागीतला. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचे फोटो काढले व ''आम्ही काईम ब्रान्च वाले आहोत, तुला घरी सोडून देतो.'' असे म्हणुन त्यांनी आपल्या आणलेल्या पल्सर गाडीचे मधामध्ये तिला बसवून ट्रिपलसिट घेवून जात असता आरोपीतांनी तिला तिचे घरी न सोडता कान्होलीबारा रोड कडे घेवून गेले. तसेच फिर्यादीच्या शरीराला मागून हात लावून तिला लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे फिर्यादीला आरोपीतांवर संशय आल्याने फिर्यादीने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीतांनी मोटर सायकल थाबंविली. त्यानंतर फिर्यादी ही तिचे घराकडे पळुन गेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 341, 354, 354(अ), 354 (ड), 170, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दराडे मो.न. 8175479647 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

1) पो. स्टे. नरखेड :– फिर्यादी यांची बहीण नामे– योगिता निहार सारथी (पत्नी) व आरोपी नामे– 1) पति– निहार अशोक सारथी या दोघांचे लग्न दि. 19/06/2016 रोजी रितीरीवाजाप्रमाणे झाले असून ते दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर नरखेड येथे दिनांक 11/10/2016 ते दिनांक 11/02/2021 चे 18.00 वा. पर्यंत आरोपी नामे– 1) निहार सारथी व 2) सौ. सुनिता अशोक सारथी (सासू), दोन्ही रा. सारथी नगर रामटेकडी प्लॉट क 5/21 हडपसर पुणे यांनी संगनमत करून फिर्यादीच्या बहीणीला वारंवार माहेरून सोन्याचे दागिणेची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– स्वपनिल शंकरराव नारनवरे, वय 33 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 406, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ राजु गजभिये 9850845542 हे करीत आहे.

2) पो. स्टे. अरोली :– फिर्यादी नामे– प्रियंका सुर्यभान भगत, वय 28 वर्ष, रा. राजोली ता. मौदा, ह. मु. मोहगाव ता. तुमसर जि. भंडारा (पत्नी) व आरोपी नामे– 1) पति– सुर्यनारायण मदन भगत हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 09 कि.मी. अंतरावर मौजा राजोली येथे दिनांक 15/01/2021 चे 13.30 वा. ते दिनांक 16/01/2021 चे 12.00 वा. पर्यंत आरोपी नामे– 1) सुर्यनारायण भगत व 2) गं भा सिताबाई मदन भगत 3) सचिन मदन भगत 4) कांतीलाल रामचंद्र भगत 5) छबीलाल परीहार 6) विजय जांभुळकर 7) प्रदीप भगत सर्व रा. राजोली ता मौदा जि भंडारा 8) सौ सुनंदा रामु चौधरी, रा नवकन्या नगर पारडी नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादीला लग्नातील आंदनाचे 1,24,000/–रू. आपले वडीलास मागुन आण असे म्हणुन आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 323, 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगोले हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर